क्रमांक : का.स./बैठक/२१५

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : २० मार्च, २००६.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २८ फेब्रुवारी, २००६ (मंगळवार) रोजी झालेल्या २१५ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

२०.३.२००६

सचिव,
कार्यकारी समिती

**प्रति :**

| | | |
|---|---|---|
| मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर,<br>"प्रिया", वरळी सी फेस, वरळी,<br>मुंबई - ४०० ०१८. | - | सदस्य |
| श्री.र.य.तांबे,<br>ए-६००, शिवम अपार्टमेंट्स,<br>सुरेंद्रनगर, आरपीटीएस रोड,<br>नागपूर - ४४० ०१५. | - | सदस्य |
| श्री. हरिशंकरन्,<br>कार्यकारी संचालक - इन्फ्रास्ट्रक्चर,<br>इन्फ्रास्ट्रक्चर लिजिंग अँड फिनान्सिअल सर्व्हिसेस लिमिटेड,<br>वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),<br>मुंबई - ४०० ०५१. | - | सदस्य |
| प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | सदस्य |

...२/-

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
<u>मुंबई - ४०० ००१.</u>

प्रधान सचिव, - सदस्य
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
<u>मुंबई - ४०० ०३२.</u>

व्यवस्थापकीय संचालक - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
<u>मुंबई - ४०० ०२३.</u>

महानगर आयुक्त - सदस्य
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.

<u>निमंत्रित</u> :

प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
<u>मुंबई - ४०० ०३२.</u>

प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
<u>मुंबई - ४०० ०३२.</u>

सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
<u>मुंबई - ४०० ०३२.</u>

<u>प्रत अग्रेषित :-</u>

विधी सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
# कार्यकारी समितीच्या २१५ व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २८ फेब्रुवारी, २००६ (मंगळवार) |
| वेळ | : | सकाळी ११.३० वाजता |
| सभास्थान | : | मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>५ वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री.रा.मे.प्रेमकुमार<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर | - | सदस्य |
| श्री.र.य.तांबे | - | सदस्य |
| श्री.रामानंद तिवारी<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| श्री.अशोक सिन्हा<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको | - | सदस्य |
| डॉ.टी.चंद्र शेखर<br>महानगर आयुक्त | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्रीमती शर्वरी गोखले
प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन

श्री.व्ही.के.जयरथ
सचिव (उद्योग),
उद्योग व उर्जा विभाग,
महाराष्ट्र शासन

श्री.के.एन.पटेल
विधी सल्लागार,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.सुरेश परदेशी
मुख्य लेखा अधिकारी व वित्त सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.अ.वि.देशिंगकर
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मुर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.यु.व्ही.लुकतुके
प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

कु.उमा अड्सुमल्ली
प्रमुख, नियोजन विभाग
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.के.आर.घोरपडे
प्रमुख नियोजक (प्रकल्प)
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.डी.डी.भिडे
मुख्य अभियंता,
मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण

श्री.प्र.ह.राऊत
सचिव, कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

**<u>बाब क्र.१</u> : <u>प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १ फेब्रुवारी, २००६ रोजी झालेल्या २१४ व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.</u>**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

..३/-

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १ फेब्रुवारी, २००६ रोजी झालेल्या २१४ व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

२.१ कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवालासंबंधात खालीलप्रमाणे चर्चा झाली :–

**बाब क्र.७ : वांद्रे-कुर्ला संकुलातील मिठी नदीच्या पात्राची रुंदी व खोली (माहिम कॉजवे ते सी.एस.टी. पूलापर्यंत) वाढविण्याचे काम तसेच मिठी नदीच्या परिसराचा विकास करण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, श्री.र.य.तांबे, सदस्य, कार्यकारी समिती यांनी कार्यकारी समितीच्या मागील २१४ व्या बैठकीत सूचना केल्याप्रमाणे मिठी नदीच्या पात्राच्या रुंदीकरणाच्या व खोलीकरणाच्या कामाची मोजमापे घेण्याच्या पध्दतीबाबतची टिप्पणी तयार करुन या बैठकीत सादर केली आहे. तसेच मिठी नदी व वाकोला नाला यांच्या प्रस्तावित कामांसंबंधात, संबंधीत पुनर्वसनाच्या कामांसह, सविस्तर सादरीकरण तयार केले असून या सादरीकरणाची प्रत (Hard Copy) या बैठकीत सादर करण्यात आली आहे.

२.२ त्यानंतर, कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.३ : वांद्रे-कुर्ला संकुलातील मिठी नदीच्या पात्राची रुंदी व खोली (माहिम कॉजवे ते सी.एस.टी. पूलापर्यंत) वाढविण्याचे काम तसेच मिठी नदीच्या परिसराचा विकास करणे यासाठीच्या टप्पा-१ मधील कामांसाठी प्राप्त झालेल्या लघुत्तम निविदांना मान्यता देणेबाबत.**

३.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, राज्य शासनाने डॉ.चितळे यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या सत्यशोधन समितीच्या अंतरिम अहवालाप्रमाणे तसेच मा.उच्च न्यायालयात प्रलंबित असणा-या याचिकेच्या अनुषंगाने वांद्रे-कुर्ला संकुलातील मिठी नदी तसेच वाकोला नाला यांच्या प्रवाहाच्या वहन क्षमतेमध्ये सुधारणा करण्याचे तसेच काही अरुंद भागातील रुंदीकरण / खोलीकरण करण्याचे काम प्राथम्याने हाती घेऊन येत्या

पावसाळयापूर्वी पूर्ण करणे अनिवार्य आहे. या अनुषंगाने सविस्तर अंदाजपत्रके बनवून टप्पा-१ व २ च्या कामांसाठी सार्वजनिकरित्या वृत्तपत्रात निविदा सूचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या. त्यास प्राप्त झालेल्या प्रतिसादाप्रमाणे टप्पा-१ मधील तीन कामांसाठी एकूण १० निविदा प्राप्त झाल्या. या निविदांची छाननी करुन लघुत्तम निविदाकारांच्या निविदा कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आल्या आहेत जेणेकरुन प्रत्यक्ष कामास लगेचच सुरुवात करता येईल व ही कामे वेळीच पूर्ण करणे शक्य होईल. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, खोदाईच्या कामातून निघणारा गाळ टाकण्यासाठी कंत्राटदारास शक्यतोवर बृहन्मुंबई हद्दीत शासकीय खदान उपलब्ध करुन देण्यात येईल. गाळ वाहून नेण्यासाठी निविदेतील दरामध्ये १० कि.मी. अंतराचा वाहतूक खर्च अंतर्भूत असून त्यापुढील वाढीव वाहतूकीसाठी प्रति कि.मी., प्रति घन मीटर परिमाणासाठी रु.७/- प्रमाणे जादा अदायगी करण्यात येईल. तसेच खोदाईतून निघालेला गाळ बृहन्मुंबई हद्दीबाहेर नेऊन त्याची विल्हेवाट लावावी लागल्यास व अशा प्रसंगी कंत्राटदारांना टोल कर भरावा लागल्यास योग्य त्या पावती आदींच्या आधारे टोल कराची प्रतिपूर्ती प्राधिकरणाकडून करण्यात येईल. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मिठी नदी व वाकोला नाला यांच्या कामासंबंधात सविस्तर पूरक टिप्पणी तयार करुन बैठकीत सादर केली आहे.

**३.२** महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, वांद्रे-कुर्ला संकुलाच्या “एच” आणि “आय” ब्लॉकमध्ये नाईक नाला, ए-बी आऊटफॉल नाला आणि शाहूनगर नाला अशा छोटया रुंदीचे अन्य प्रवाह आहेत. या प्रवाहातील गाळ काढण्यासाठी वृत्तपत्रात जाहिरात देऊन दिनांक २१ मार्च, २००६ पर्यंत निविदा मागविण्यात आल्या आहेत. या कामांचा अंदाजित खर्च सुमारे रु.८३ लाख इतका आहे. सदर गाळ काढण्याची कामे तातडीने हाती घेऊन पावसाळयापूर्वी पूर्ण करणे आवश्यक आहे. म्हणून सदर कामांसाठी प्राप्त होणा-या लघुत्तम निविदांचे दर हे मिठी नदी व वाकोला नाला यांच्या टप्पा-१ मधील कामांच्या दराइतके अथवा त्याहून कमी असतील तर “एच” आणि “आय” ब्लॉकमधील या कामांच्या लघुत्तम निविदेस मंजूरी देण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात यावे असा प्रस्तावही कार्यकारी

..५/-

समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. त्यानुसार महानगर आयुक्तांची मान्यता घेऊन त्यानंतर काम सुरु करुन याबाबतची बाब टिप्पणी कार्यकारी समितीच्या पुढील बैठकीत सादर करण्यात येईल.

**३.३** चर्चेमध्ये सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांसंबंधात खालीलप्रमाणे स्पष्टीकरण देण्यात आले :-

(१) निविदेप्रमाणे प्रत्येक बाबीसाठी एक घन मीटर हे मोजमापाचे परिमाण असून केलेल्या कामाचे घनफळ ठरविण्यासाठी काम सुरु करण्यापूर्वी व काम पूर्ण झाल्यानंतर पात्राच्या खोलीची मोजमापे लेव्हल पध्दतीने दुर्बिण, स्टाफ यांच्या सहाय्याने घ्यावयाची आहेत. तथापि खोलीची मोजमापे अधिक अचूकपणे "इको-साऊंडिंग" पध्दतीनेही तपासली जातील तसेच या व अन्य अचूक मोजमापाच्या पध्दतीस कोणतीही हरकत नसल्याचे वचनपत्र (Undertaking) संबंधित निविदाकाराकडून त्यास कार्यादेश देण्यापूर्वी घेण्यात येईल. तसेच "इको-साऊंडिंग" पध्दतीने मोजमापे घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या मुख्य हायड्रोग्राफर व त्यांचे अनुभवी अधिकारी यांचेही मार्गदर्शन घेण्यात येईल. तसेच आवश्यकतेनुसार अशाप्रकारचे कामे करणा-या एजन्सीची नेमणूक करणेबाबतही विचार करणेत येईल.

(२) पूरक टिप्पणीमध्ये दिलेल्या प्र-पत्रातील तपशिलाप्रमाणे टप्पा-१ अंतर्गत सुमारे ७.०० लाख घनमीटर गाळ काढावयाचा आहे. उपलब्ध कालावधीचा विचार करता इतक्या मोठया प्रमाणात गाळ काढण्याचे काम पूर्ण करणे शक्य होईल काय, अशी विचारणा सदस्यांनी केली असता असे स्पष्ट करण्यात आले की, टप्पा-१ अंतर्गत सध्या प्रवाहामध्ये साठलेला गाळ प्राथम्याने काढून टाकण्याची तरतूद असून ही कामे पावसाळयापूर्वी पूर्ण करणे नितांत गरजेचे आहे. तसेच टप्पा-१ अंतर्गत काही अरुंद भागात रुंदीकरण / खोलीकरण प्रस्तावित केले

..६/-

असून तीही कामे पावसाळयापूर्वी पूर्ण करण्यासाठी सर्व ते प्रयत्न करण्यात येतील.

(३) पन्टूनवर आधारीत पोकलेन संयंत्राने प्रवाहातील गाळ काढण्याच्या पध्दतीऐवजी खाडयांमध्ये किंवा बंदरांमध्ये ज्याप्रमाणे कटर - सक्शन या गाळ काढण्याच्या संयंत्राचा उपयोग करण्यात येतो तशाच यंत्रसामुग्रीचा उपयोग मिठी नदी व वाकोला नाल्याच्या कामांसाठी करणे अधिक परिणामकारक होईल अशी सूचना सदस्यांनी केली असता असे सादर करण्यात आले की, टप्पा-१ मधील कामांसाठी कटर - सक्शन संयंत्राचा वापर करणे शक्य असल्यास तसा वापर करण्याबाबत संबंधित निविदाकारांना सूचना देण्यात येतील. तसेच मुख्य बंदर अधिकारी यांचेशी विचारविनिमय करुन या प्रस्तावित पध्दतीपेक्षा अधिक परिणामकारक पध्दती वापरण्याच्या शक्यतेबाबत पडताळणी करण्यात येईल. मात्र टप्पा-२ मधील कामांसाठी गाळ काढण्याची परिमाणे ब-याच मोठया प्रमाणावर असल्यामुळे या कामांमध्ये सध्याच्या पध्दतीऐवजी कटर - सक्शन किंवा तत्सम प्रगत यंत्रसामुग्रीचा परिणामकारक वापर करण्याबाबत प्रथम आढावा घेऊन त्याप्रमाणे या कामांच्या अंदाजपत्रकात योग्य ते बदल करण्यात येतील.

(४) टप्पा-१ व २ मधील खोदाईच्या कामातून ब-याच मोठया प्रमाणात निघणारा गाळ दूर अंतरावर वाहून नेण्यासाठी अधिक कालावधी लागणार असून खर्चातही बरीच वाढ होणार आहे, म्हणून शक्यतोवर हा गाळ वांद्रे-कुर्ला संकुलातील सखल भागात किंवा परिसरात अन्य ठिकाणी टाकणे शक्य आहे किंवा कसे याचा आढावा घ्यावा अशी सूचना सदस्यांनी केली असता असे स्पष्ट करण्यात आले की, हा गाळ टाकण्यासाठी वांद्रे-कुर्ला संकुलात आता जागा उपलब्ध नाही. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे यांनी हा गाळ टाकण्यासाठी ६ जागांची यादी प्राधिकरणास पाठविली आहे. तसेच गाळ टाकण्यासाठी सिडकोनेही काही जागा देऊ केल्या आहेत.

(५) सदस्यांनी विचारणा केली असता महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, केंद्रीय जल व उर्जा संशोधन केंद्र, पुणे यांच्या सन १९७८ च्या अहवालातील शिफारस केलेली कामे, त्यासंबंधात प्राधिकरणाने केलेली कार्यवाही तसेच आता हाती घ्यावयाची कामे याबाबत सविस्तर टिप्पणी तयार करुन कार्यकारी समितीस सादर करण्यात येईल.

(६) चर्चेदरम्यान सदस्यांनी निदर्शनास आणून दिले की, बाब टिप्पणीमध्ये असे नमूद केले आहे की, निविदा पश्चात अटींमधील अशाच प्रकारच्या कामांचा पूर्वानुभव असणे या अटीचे पालन कोणत्याही निविदाकारांनी केलेले नाही, म्हणून अशा परिस्थितीत प्रस्तुत कामे हे निविदाकार योग्यप्रकारे पूर्ण करु शकतील किंवा कसे याबाबत शंका निर्माण होते. या संबंधात असे स्पष्ट करण्यात आले की, निविदेतील सूचनेप्रमाणे निविदाकारांकडून एकूण ४ अटींची पूर्तता अपेक्षित होती. त्यापैकी अशाच कामाच्या पूर्वानुभवाशिवाय अन्य तीन अटींचे अनुपालन शिफारस केलेल्या सर्व लघुत्तम निविदाकारांनी केलेले असून निविदेमध्ये नमूद केलेल्या परिमाणाचे काम केल्याबाबतची प्रमाणपत्रेही त्यांनी सादर केली आहेत. शिवाय टप्पा-१ मधील हे सर्व तीनही लघुत्तम निविदाकार या प्राधिकरणाकडे अशाच प्रकारची व अन्य कामे गेली काही वर्षापासून करीत आहेत.

**३.४** चर्चेअंती असे ठरविण्यात आले की, मिठी नदी व वाकोला नाला यांच्या पात्रांची रुंदी व खोली वाढविण्याचे काम तसेच मिठी नदीच्या परिसराचा विकास करण्याचे काम यावर देखरेख करणे, कामाची मोजमापे घेण्याची पध्दती निश्चित करणे, झालेल्या कामाची मोजमापे घेऊन त्यानुसार कंत्राटदाराची देयके अदा करण्यासाठी शिफारस करणे इत्यादी बाबींसाठी एका निष्णात प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करण्यात यावी जेणेकरुन ही महत्वाची कामेपरिणामकारकरितीने व वेळेवर पूर्ण करणे शक्य होईल. यासाठी टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स अथवा तत्सम सल्लागार संस्थेचा विचार करण्यात यावा. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराने

..८/-

करावयाच्या कामासंबंधी टर्म्स ऑफ रेफरन्स श्री.र.य.तांबे, सदस्य, कार्यकारी समिती यांचेशी सल्लामसलत करुन निश्चित करण्यात याव्यात. पुढे असेही ठरविण्यात आले की, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची फी निश्चित करुन एकमेव स्त्रोताद्वारे (on single source basis) सल्लागाराची नेमणूक करण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना प्रदान करण्यात यावेत.

**३.५** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.९८७</u> :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे वांद्रे-कुर्ला संकुलातील मिठी नदीच्या पात्राची रुंदी व खोली (माहिम कॉजवे ते सी.एस.टी. पूलापर्यंत) वाढविण्याच्या व मिठी नदीच्या परिसराचा विकास करण्याच्या टप्पा-१ मधील कामांसाठी खालील तक्त्यानुसार लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे :-

| अनु. क्र. | कामाचे नांव व अंदाजित खर्च | लघुत्तम निविदाकाराचे नाव | सुधारीत देकाराची लघुत्तम निविदेची टक्केवारी व रक्कम |
|---|---|---|---|
| १. | वांद्रे-कुर्ला संकुलातील मिठी नदीचे माहिम कॉजवे ते धारावी पुलापर्यंत साखळी क्र.००.०० मी. ते सा.क्र.१२८० मी. व वाकोला नाल्याची सा.क्र.६४५ मी. ते २४३३ मी. मधील पात्राची रुंदी वाढवून गाळ उपसण्याचे काम. (कामाचा अंदाजित खर्च - रु.९४४.०० लाख) | मे.रिलायन्स मिशिगन (जे.व्ही.) | रु.११,३९,४०,८००/- (+२०.७०%) |

| अनु. क्र. | कामाचे नांव व अंदाजित खर्च | लघुत्तम निविदाकाराचे नाव | सुधारीत देकाराची लघुत्तम निविदेची टक्केवारी व रक्कम |
|---|---|---|---|
| २. | वांद्रे-कुर्ला संकुलामधील मिठी नदीचे धारावी पूल ते लहान संगम पर्यंत सा.क्र.१२८० ते ३३०० मी. पर्यंतचे गाळ उपसणे व पात्र रुंद करणेचे काम. (कामाचा अंदाजित खर्च - रु.५१९.०० लाख) | मे.आर.पी.शाह | रु.६,२२,८०,०००/- (+२०.००%) |
| ३. | वांद्रे-कुर्ला संकुलामधील मिठी नदीचे लहान संगम पासुन सी.एस.टी. पूलापर्यंत सा.क्र.३३०० मी. ते सा.क्र.५९३० मी. पर्यंतचे गाळ उपसणे व पात्र रुंद करणेचे काम. (कामाचा अंदाजित खर्च - रु.१०९०.०० लाख) | मे.शाम नारायण अँड ब्रदर्स | रु.१३,०८,००,०००/- (+२०.००%) |

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** मिठी नदी व वाकोला नाला यांच्या पात्रांची रुंदी व खोली वाढविण्याच्या तसेच मिठी नदीच्या परिसराचा विकास करण्याच्या टप्पा-१ मधील कामांवर देखरेख करणे, कामाची मोजमापे घेण्याची पध्दती निश्चित करणे, झालेल्या कामाची मोजमापे घेऊन त्यानुसार कंत्राटदाराची देयके अदा करण्यासाठी शिफारस करणे इत्यादी बाबींसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची फी निश्चित करुन एकमेव स्त्रोताद्वारे (on single source basis) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराने करावयाच्या कामासंबंधी टर्म्स ऑफ रेफरन्स् श्री.र.य.तांबे, सदस्य, कार्यकारी समिती यांचेशी सल्लामसलत करुन निश्चित करण्यात याव्यात.

**"आणखी असा ठराव करण्याल येत आहे की,** वांद्रे-कुर्ला संकुलातील मिठी नदी व वाकोला नाला यांच्या पात्रांची रुंदी व खोली वाढविण्याच्या तसेच मिठी नदीच्या परिसराचा विकास करण्याच्या टप्पा-१ मधील कामांसाठी प्राप्त झालेल्या लघुत्तम निविदेच्या दराइतक्या किंवा त्याहून कमी दराने वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "एच" व "आय" ब्लॉकमधील नाल्यांतील गाळ काढण्याच्या कामाच्या लघुत्तम निविदेचे दर प्राप्त झाल्यास सदरील लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह

अधिदान करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे. यासंबंधीची बाब टिप्पणी कार्यकारी समितीच्या पुढील बैठकीत सादर करण्यात यावी.

**"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** या बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.४ : वांद्रे-कुर्ला संकुलातील मिठी नदीच्या पात्राची रुंदी व खोली (माहिम कॉजवे ते सी.एस.टी. पूलापर्यंत) वाढविण्याचे काम तसेच मिठी नदीच्या परिसराचा विकास करणे यासाठीच्या टप्पा-२ मधील कामांसाठी प्राप्त झालेल्या लघुत्तम निविदांबाबत.**

**४.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र शासनाने डॉ.चितळे यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या सत्यशोधन समितीच्या अंतरिम अहवालाप्रमाणे तसेच मा.उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या याचिकेच्या अनुषंगाने वांद्रे-कुर्ला संकुलातील मिठी नदी व वाकोला नाला यांच्या प्रवाहाच्या क्षमतेमध्ये सुधारणा करण्याची तसेच काही भागांमधील रुंदीकरणाची कामे हाती घ्यावयाची आहेत. ही कामे दोन टप्प्यात करावयाची आहेत. त्यानुसार टप्पा-१ व २ च्या कामांसाठी सविस्तर अंदाजपत्रके बनवून सार्वजनिकरित्या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या. टप्पा-२ मधील एकूण ३ कामांसाठी २४ कोरे निविदा संच विकले गेले. तथापि विहित वेळेमध्ये प्रत्येक कामासाठी १ अशाप्रकारे एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, टप्पा-२ मधील काम क्र. ५ व ६ च्या लघुत्तम निविदांचे देकार अंदाजित खर्चापेक्षा फारच जास्त दराचे असल्यामुळे सदर दोन्ही निविदा रद्द करुन फेरनिविदा मागविणे उचित होईल असे प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच टप्पा-२ मधील काम क्र.४ च्या निविदेचा सुधारीत देकार अंदाजित खर्चापेक्षा ३२.४ % जास्त असल्याने कामाची निकड विचारात घेऊन ही निविदा स्विकारावी किंवा कसे याबाबत मार्गदर्शन करावे अशी कार्यकारी समितीस विनंती करण्यात आली आहे.

४.२ चर्चेनंतर कार्यकारी समितीने असा निर्णय घेतला की, टप्पा-२ मधील कामांसाठी प्राप्त झालेल्या तीनही निविदा अंदाजित खर्चापेक्षा फारच जास्त दराच्या असल्याने नाकारण्यात याव्यात व सदर कामांसाठी फेरनिविदा मागविण्यात याव्यात. त्यानंतर, कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.९८८ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे वांद्रे-कुर्ला संकुलातील मिठी नदीच्या पात्राची रुंदी व खोली (माहिम कॉजवे ते सीएसटी पूलापर्यंत) वाढविण्याच्या व मिठी नदीच्या परिसराचा विकास करण्याच्या टप्पा-२ मधील कामांसाठी प्राप्त झालेल्या सर्व निविदा नाकारीत आहे. टप्पा-२ च्या कामांसाठी फेरनिविदा मागविण्यात याव्यात."

**बाब क्र.५ : मनोरी - गोराई - उत्तन या मनोरंजन व पर्यटन क्षेत्राचा विकास आराखडा बनविण्यासाठी सल्लागाराची नेमणूक करणे.**

**५.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मनोरी-गोराई-उत्तन क्षेत्राचा मनोरंजन व पर्यटन विकास क्षेत्र म्हणून विकास करण्यासाठी राज्य शासनाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक केली आहे. या क्षेत्राचा विकास आराखडा बनविण्यासाठी सल्लागाराची नेमणूक करण्यासंबंधात पुढील कार्यवाही करण्यास प्राधिकरणाने दिनांक १९ एप्रिल, २००५ रोजी झालेल्या ११३ व्या बैठकीत मान्यता दिली आहे. त्यानुसार, वर्तमानपत्रात जाहिरात देऊन विकास आराखडा बनविण्यासाठी सल्लागार संस्थांकडून Expression of Interest मागविण्यात आले असता देशातून व परदेशातून एकूण ३० सल्लागार संस्थांनी इच्छुक असल्याचे कळविले. त्यापैकी ८ सल्लागार संस्थांकडून तांत्रिक व आर्थिक प्रस्ताव मागविण्याबाबत मूल्यमापन समितीने शिफारस केली. त्यापैकी ४ सल्लागारांकडून प्रस्ताव प्राप्त झाले. मूल्यमापन समितीने या प्रस्तावांचे मूल्यमापन

करुन शिफारस केलेल्या २ सल्लागार संस्थांच्या आर्थिक प्रस्तावांची छाननी केली असता M/s Kritzinger + Rao, Los Angels, California, USA व Arcop Associats Pvt. Ltd., New Delhi यांनी अनुक्रमे रु.२.३७ कोटी व रु.५.९ कोटी इतकी फी दर्शविली होती. सदर फी Indian Institute of Town Planners (ITPI) च्या सल्लागार शुल्काच्या मार्गदर्शक तत्वानुसार फारच जास्त असल्याने फी कमी करण्यासाठी वाटाघाटी केल्या असता लघुत्तम फी नमूद केलेल्या सल्लागारांनी फी कमी करण्यास असमर्थता व्यक्त केली. त्यानंतर, ITPI च्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे सल्लागार फी रु.५० लाख + सेवाकर इतकी निश्चित करुन तसेच कामाच्या व्याप्तीमध्ये कोणताही बदल न करता, प्राथमिक मूल्यमापनानुसार १६ सल्लागारांकडून पुनःश्च प्रस्ताव मागविण्यात आले. प्राप्त झालेल्या ६ प्रस्तावांची छाननी केली असता M/s EPC Development Planning & Management Pvt. Ltd., Ahmedabad यांनी सर्वात जास्त गुण मिळविल्याने त्यांना सल्लागार म्हणून नियुक्त करण्याची शिफारस मूल्यमापन समितीने केली. त्यानुसार M/s EPC Development Planning & Management Pvt. Ltd., Ahmedabad यांची मनोरी-गोराई-उत्तन अधिसूचित क्षेत्रासाठी विकास आराखडा बनविण्यासाठी सल्लागार म्हणून रु.५० लाख + सेवाकर इतक्या फी वर नेमणूक करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

**५.२** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>**ठराव क्र.९८९**</u> :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मनोरी-गोराई-उत्तन या क्षेत्रासाठी मनोरंजन व पर्यटन विकास आराखडा बनविण्यासाठी M/s. EPC Development Planning & Management Pvt. Ltd., Ahmedabad

यांची रु.५० लाख + सेवाकर इतक्या फी वर सल्लागार म्हणून नेमणूक करण्यास मान्यता देत आहे.

**“असाही ठराव करण्यात येत आहे की,** सल्लागारांच्या कामाचा आढावा घेणे व विकास आराखडा वेळेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.”

**बाब क्र.६: मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत हाती घेतलेल्या कामांपैकी असमाधानकारक प्रगती असणारी कामे मूळ कंत्राटदाराकडून काढून इतर मान्य कंत्राटदारांकडून करुन घेणेबाबत.**

**६.१** या बाब टिप्पणीबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पूर्व व पश्चिम द्रुतगती महामार्गावरील सुधारणांची कामे १५ भागांमध्ये विभागून निरनिराळया कंत्राटदारांकडून हाती घेण्यात आली आहेत. सदर कामे सन २००६ च्या पावसाळयापूर्वी पूर्ण करणे आवश्यक आहे. परंतु, बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, काही कामांची प्रगती समाधानकारक नाही. येत्या पावसाळयापूर्वी किमान मुख्य रस्ता व नाले / गटारे यांची कामे शक्यतो पूर्ण करणे तसेच सुरक्षित टप्प्यावर आणून ठेवणे आवश्यक आहे. म्हणून ज्या कंत्राटदारांची कामातील प्रगती असमाधानकारक आहे किंवा जी कामे नियोजित कार्यक्रमापेक्षा खूपच मागे पडली आहेत अशी अपूर्ण राहिलेली कामे त्या कंत्राटदारांकडून काढून घेऊन कार्यकारी समितीच्या मान्यतेने नियुक्त केलेल्या व याच प्रकल्पांतर्गत कामे करणाऱ्या इतर कंत्राटदारांकडून करुन घेण्याचे प्रस्तावित आहे. अशाप्रकारे कामांचे हस्तांतरण करीत असताना नव्याने नियुक्त करावयाच्या कंत्राटदाराला मूळ कंत्राटदाराच्या करारनाम्यातील अटी व शर्ती बंधनकारक राहतील. तसेच मूळ करारनाम्यात नमूद करण्यात आलेल्या दराने किंवा त्यापेक्षा कमी दराने नवीन कंत्राटदाराला नव्याने देण्यात आलेले काम करावे लागेल. त्याचप्रमाणे नवीन नियुक्त कंत्राटदाराकडून त्यांच्याकडील मूळात असलेल्या कामांसाठी

घेतलेल्या परफॉर्मन्स् गॅरंटी व्यतिरिक्त नवीन कामासाठी अतिरिक्त परफॉर्मन्स् गॅरंटी घेण्यात येईल. तसेच काम काढून घेतल्याबद्दल मूळ कंत्राटदारांकडून कोणतीही मागणी येणार नाही याची काळजी घेतली जाईल. अशाप्रकारे, बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, पश्चिम द्रुतगती महामार्गावरील एकूण ६ कामे मूळ कंत्राटदारांकडून काढून घेऊन नवीन कंत्राटदारांना द्यावयाचे प्रस्तावित केले आहे. अशाप्रकारे कामाचे हस्तांतरण केल्यास प्राधिकरणावर कोणताही अतिरिक्त आर्थिक भार पडणार नाही याची खात्री संबंधित अधिक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी केलेली आहे. सदर कामे तातडीने पूर्ण करणे आवश्यक असल्याने, ही कामे मूळ कंत्राटदारांकडून काढून घेऊन नवीन कंत्राटदारांकडून हाती घेण्यास मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांची मान्यता घेण्यात आली असून आता ही बाब कार्यकारी समितीच्या कार्योत्तर मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहे.

**६.२** महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत हाती घेतलेल्या वरील ६ कामांव्यतिरिक्त भविष्यात इतर काही कामांची प्रगती असमाधानकारक असल्याचे निदर्शनास आल्यास अशी कामे मूळ कंत्राटदारांकडून काढून घेऊन मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी कार्यकारी समितीच्या मान्यतेने नियुक्त केलेल्या इतर कंत्राटदारांकडून करुन घेण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात यावे असाही प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

**६.३** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :—

**ठराव क्र.९९०** :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन,

कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत हाती घेतलेल्या खालील कामांची प्रगती असमाधानकारक असल्यामुळे ही कामे मूळ कंत्राटदाराकडून काढून घेऊन, मूळ कंत्राटदारांच्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार, खाली नमूद केलेल्या स्तंभ ६ मधील कंत्राटदारांना प्रस्तावित देकाराच्या किंमतीस देण्यास कार्योत्तर मान्यता देत आहे :-

| अ. क्र. | कामाचे नांव / निविदेची तारीख | मूळ कंत्राटदाराकडून काढून घेणेचे प्रस्तावित असलेल्या कामाचा भाग | काढून घ्यावयाच्या कामाची अंदाजित किंमत / मूळ पूर्ण कामाची निविदा किंमत | शिल्लक काम ज्याच्याकडून काढून घेणे प्रस्तावित आहे अशा कंत्राटदाराचे नाव व स्विकृत निविदेच्या देकाराचा दर | काढून घेतलेल्या कामासाठी नियुक्त करणे प्रस्तावित असलेल्या नवीन कंत्राटदाराचे नांव व प्रस्तावित देकाराचा दर | अतिरिक्त आर्थिक भार |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
| १. | कलानगर ते वाकोला दरम्यान पश्चिम द्रुतगती मार्गाची सुधारणा करणे (पॅकेज क्र.१) (निविदेची तारीख - ०१/०६/२००४) | माहिम ते कलानगर दरम्यानचा रस्त्याचा भाग सा.क्र.५२७/६८० ते ५२६/७०० | रु.६.५० कोटी (निविदा किंमत - रु.३६.४० कोटी) | मे.यु.पी.एस.बी.सी. लिमिटेड (-४.७०%) | मे.रिलायन्स कन्स्ट्रक्शन कंपनी (-६.३९%) | काही नाही. कामाच्या खर्चात १.६९% इतकी बचत (अंदाजे) |
| २. | कलानगर ते वाकोला दरम्यान पश्चिम द्रुतगती मार्गाची सुधारणा करणे (पॅकेज क्र.२) (निविदेची तारीख - ०१/०६/२००४) | कलानगर ते वाकोला दरम्यान पूर्वेकडील सेवारस्ता सा.क्र.५२६/७०० ते ५२३/८०० | रु.२.०० कोटी (निविदा किंमत - रु.३६.४० कोटी) | मे.यु.पी.एस.बी.सी. लिमिटेड (-४.७०%) | मे.एम.वेंकटराव (-४.७०%) | काही नाही |
| ३. | आरे उड्डाणपूल ते टाईम्स ऑफ इंडिया कार्यालयाच्या दरम्यान पश्चिम द्रुतगती मार्गाची सुधारणा करणे (पॅकेज क्र.६) (निविदेची तारीख - १८/०६/२००४) | नियोजित दिंडोशी उड्डाणपूलाच्या लांबीत येणारा रस्त्याचा भाग सा.क्र.५१२/३५० ते ५१३/०५० | रु.१.५० कोटी (निविदा किंमत - रु.२६.५० कोटी) | मे.के.बी.ब्रम्हपुत्रा (-२.२५%) | मे.जे.कुमार अँड कंपनी (-२.२५%) | काही नाही. |

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
|---|---|---|---|---|---|---|
| ४. | आरे उड्डाणपूल ते टाईम्स ऑफ इंडिया कार्यालयाच्या दरम्यान पश्चिम द्रुतगती मार्गाची सुधारणा करणे (पॅकेज क्र.६) (निविदेची तारीख - १८/०६/२००४) | नियोजित टाईम्स ऑफ इंडिया उड्डाणपूलाच्या लांबीत येणारा रस्त्याचा भाग सा.क्र.५१०/३५० ते ५१०/९६० | रु.२.५० **कोटी** (निविदा किंमत - रु.२६.५० कोटी) | मे.के.बी.ब्रम्हपुत्रा (-२.२५%) | मे.अमेय डेव्हलपर्स आणि मे.जे.कुमार (J.V.) (-२.२५%) | काही नाही. |
| ५. | टाईम्स ऑफ इंडिया ते आशानगर भूयारी मार्गादरम्यान पश्चिम द्रुतगती मार्गाची सुधारणा करणे (पॅकेज क्र.७) (निविदेची तारीख - ११/०३/२००४) | नियोजित ठाकूर कॉम्प्लेक्स उड्डाणपूलाच्या लांबीत येणारा रस्त्याचा भाग सा.क्र.५०८/५७० ते ५०९/३०५ | रु.५.०० **कोटी** (निविदा किंमत - रु.२६.१० कोटी) | मे.अटलांटा इन्फ्रास्ट्रक्चर्स लिमिटेड (अंदाजपत्रकीय दराने) | मे.अमेय डेव्हलपर्स व मे.जे.कुमार आणि कंपनी (J.V.) (अंदाजपत्रकीय दराने) | काही नाही. |
| ६. | कुलूपवाडी पादचारी भूयारी मार्ग ते एस.एन.दुबे रोड दरम्यान पश्चिम द्रुतगती मार्गाची सुधारणा करणे (पॅकेज क्र.९) (निविदेची तारीख - ११/०३/२००४) | डांबरीकरणाचे शिल्लक काम सा.क्र.५०४/००० ते ५०६/५०० | रु.३.५० **कोटी** (निविदा किंमत - रु.२९.६३कोटी) | मे.अटलांटा इन्फ्रास्ट्रक्चर्स लिमिटेड (अंदाजपत्रकीय दराने) | मे.पी.बी.ए. इन्फ्रास्ट्रक्चर्स लिमिटेड (अंदाजपत्रकीय दराने) | काही नाही. |

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत हाती घेतलेल्या कामांपैकी भविष्यात कोणत्याही कंत्राटदाराच्या कामातील प्रगती असमाधानकारक असल्यास त्या कंत्राटदाराकडून काम काढून घेऊन सदर काम कार्यकारी समितीने मंजूर केलेल्या इतर कंत्राटदारांना, मूळ कंत्राटदाराच्या दराने किंवा त्यापेक्षा कमी दराने तसेच मूळ कंत्राटदाराच्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार, देण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

..१७/-

**बाब क्र.७ : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल दिनांक १ जानेवारी, २००६ ते दिनांक २० फेब्रुवारी, २००६.**

दिनांक १ जानेवारी, २००६ ते दिनांक २० फेब्रुवारी, २००६ पर्यंतच्या प्राधिकरणाकडील अतिरिक्त निधीच्या गुंतवणूक अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**पटल बाब : इन्स्टिटयूट ऑफ अर्बन ट्रान्स्पोर्ट (इंडिया) या संस्थेस सार्वजनिक वाहतूकीकरीता पर्यायी तंत्रज्ञानावरील चर्चासत्र व प्रदर्शनाच्या प्रायोजनासाठी रु.१ लाख देण्याबाबत.**

या प्रस्तावाबाबत माहिती देताना प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांनी असे सांगितले की, इन्स्टिटयूट ऑफ अर्बन ट्रान्स्पोर्ट (इंडिया) या संस्थेने सार्वजनिक वाहतूकीकरीता पर्यायी तंत्रज्ञान या विषयावर एक चर्चासत्र व प्रदर्शन नवी दिल्ली येथे दिनांक २१ ते २३ मार्च, २००६ या कालावधीत आयोजित केले आहे. केंद्र शासनाच्या नगर विकास मंत्रालयाने या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी पाठिंबा दिलेला आहे. या प्रदर्शनामध्ये पर्यायी तंत्रज्ञानाचे बहुसंख्य आंतरराष्ट्रीय प्रचालक व उत्पादक सहभागी होण्याचे अपेक्षित असून त्यांचे प्रतिनिधीहि चर्चासत्रात सहभागी होतील. इन्स्टिटयूट ऑफ अर्बन ट्रान्स्पोर्टच्या उपाध्यक्षांनी प्राधिकरणास अशी विनंती केली आहे की, या कार्यक्रमामध्ये सहभागी होऊन रु.१ लाख इतके वित्तीय सहाय्य द्यावे व त्या वित्तीय सहाय्यापोटी प्राधिकरणाच्या तीन प्रतिनिधींना चर्चासत्रात विनाशुल्क सहभागी होता येईल. परिवहन क्षेत्रातील पायाभूत सुविधांचे विविध प्रकल्प प्राधिकरण राबवित असल्यामुळे या चर्चासत्रातून प्राधिकरणाला अनुभवाची देवाणघेवाण करता येईल तसेच विविध शहरांमधील सार्वजनिक वाहतूकीच्या पर्यायी तंत्रज्ञानाची माहिती घेता येईल. या दृष्टीकोनातून प्राधिकरणाने या चर्चासत्रामध्ये सहभागी व्हावे व त्यासाठी प्रायोजनाची रक्कम म्हणून रु.१ लाख इन्स्टिटयूट ऑफ अर्बन ट्रान्स्पोर्ट (इंडिया) या संस्थेस द्यावेत असा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

त्यानंतर, पटल बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.९९१ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** कार्यकारी समिती याद्वारे इन्स्टिटयूट ऑफ अर्बन ट्रान्स्पोर्ट (इंडिया), दिल्ली या संस्थेने दिनांक २१ ते २३ मार्च, २००६ या कालावधीत आयोजित केलेल्या सार्वजनिक वाहतूकीकरीता पर्यायी तंत्रज्ञानावरील चर्चासत्र व प्रदर्शनाच्या प्रायोजनासाठी रु.१,००,०००/- (रुपये एक लाख मात्र) इतके वित्तीय सहाय्य देण्यास मान्यता देत आहे."

**मा.अध्यक्षांच्या परवानगीने चर्चा केलेले इतर विषय :**

श्री.के.एन.पटेल, प्राधिकरणाचे विधी सल्लागार यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाची ट्रस्ट म्हणून नोंदणी आयकर कायद्याच्या कलम १२(अ) नुसार करण्यात आली आहे. तथापि, आयकर खात्याने नुकतीच प्राधिकरणास नोटीस पाठवून ही नोंदणी रद्द का करण्यात येऊ नये अशी विचारणा केली आहे. यासंबंधात आयकर खात्याकडे सुनावणीही होणार आहे. प्राधिकरणाने याबाबत उच्च न्यायालयात अपील करावे असा सल्ला आयकर सल्लागाराने दिला आहे. आयकर खात्याकडून प्राप्त झालेल्या नोटीसवर योग्य ती कार्यवाही करण्यास व आवश्यकता वाटल्यास उच्च व सर्वोच्च न्यायालयात अपील करण्यास कार्यकारी समितीने महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करणे उचित होईल. सदर प्रस्तावाला कार्यकारी समितीने मान्यता देऊन पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.९९२ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (सहा) तसेच कलम ७ चे

..१९/-

उपकलम (५) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे महानगर आयुक्त यांना आयकर खात्याकडून प्राप्त झालेल्या नोटीसवर योग्य ती कार्यवाही करण्यास व आवश्यकतेनुसार उच्च व सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करण्यास प्राधिकृत करीत आहे."

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

——— oooooooooooo ———